मुंब्रा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९४५ /२०२६ दि. ०४ /०८/२०२६

–: **वाहतूक नियंत्रण अधिसूचना** :–

ज्याअर्थी, मुंब्रा वाहतुक उपविभागाच्या हद्दीतुन डोंबिवली येथून कल्याण फाटा मार्गे नवी मुंबई दिशेने जाणारे व परत येणारे वाहिनीवर लहान मोठया वाहनांची दैनंदीनरित्या मोठया प्रमाणात वाहतुक होत असते. महापे, पनवेल व वाशी या भागामध्ये मोठे औदयोगिक प्रकल्प आहे. सदर औद्योगिक प्रकल्पामध्ये अनेक कंपनी असून कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, इत्यादी येथून महापे, पनवेल व वाशी येथील औद्योगिक प्रकल्पास जाणे–येणेकरिता कल्याण फाटा पाईपलाईन एकमेव मार्ग आहे. परिणामी सदर ठिकाणी वाहनांचा वापर करून कामावर जाणाऱ्या नागरीकांची संख्या मोठया प्रमाणात आहे. कल्याण फाटा येथून महापे येथे जाणेकरिता पाईपलाईन असून सदरची पाईप लाईन ही छोटी आहे. सकाळी दैनंदिन कामावर जाणारा कामगार वर्ग हा डोंबिवली येथून कल्याण फाटा मार्गे महापे येथे पाईप लाईन मार्गे जाणारे व सायंकाळी महापे येथून महापे पाईप लाईन मार्गे कल्याण फाटा येथून डोबिवली कडे कामावरून परत येणारा कामगार वर्गाची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – **१)** कल्याण फाटया वरुन एम.आय.डी.सी. पाईपलाईन रोडने महापे, नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कल्याणफाटया कडील एम.आय.डी.सी.रोड स्टार्टींग पाईंट** येथे **" प्रवेश बंद "** करण्यात येत आहे. **(दुपारी १५:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पावेतो)**

पर्यायी मार्ग – सदरची वाहने कल्याण फाटा येथुन उजवीकडे वळुन शिळफाटा येथुन डावीकडे वळुन पुजापंजाब हॉटेल येथुन पुढे महापे, नवी मुंबई कडे इच्छित स्थळी जातील. **(दुपारी १५:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पावेतो)**

प्रवेश बंद – **२)** महापे, नवी मुंबई कडुन पुजापंजाब हॉटेल येथुन एम.आय.डी.सी. पाईपलाईन रोडने कल्याण फाटयाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पुजापंजाब हॉटेल कडील एम.आय.डी.सी.रोड स्टार्टींग पाईंट** येथे **" प्रवेश बंद "** करण्यात येत आहे. **(सकाळी ०६:०० वा. ते दुपारी १५:०० वा. पावेतो)**

पर्यायी मार्ग – सदरची वाहने पुजापंजाब हॉटेल येथुन पुढे येवुन शिळफाटा येथुन उजवीकडे वळुन कल्याण फाटा येथुन इच्छित स्थळी जातील. **(सकाळी ०६:०० वा. ते दुपारी १५:०० वा. पावेतो)**

सदर अधिसूचना प्रसिध्द झाले तारखेपासुन पुढे अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाठ)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे/नवी मुंबई.
मा. आयुक्त, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ५, वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/नवी मुंबई.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई महानगरपालिका.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व पो.निरी. मुंब्रा, डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग ठाणे.